# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

**परिपत्रक क्र.२२२ /२०२३**

**विषय :- ''स्वच्छताही सेवा'' अंतर्गत कार्यक्रम आयोजित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मा.श्री.अ.म.बाविस्कर, उप सचिव यांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ पत्रान्वये मा.प्रधानमंत्री यांनी केलेल्या आवाहनानुसार दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता पासून १ तास **'स्वच्छताही सेवा'** अंतर्गत राज्यभरात स्वच्छतेसाठी श्रमदान कार्यक्रम आयोजित करण्याचे अभिप्रेत आहे. या अनुषंगाने विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थीमार्फत स्वच्छता करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. तसेच आपल्या संलग्नित महाविद्यालयात सदर उपक्रमाची व्यापक प्रचार-प्रसिध्दी करुन सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे, असे कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, सर्व प्रशाला व प्रशासकीय विभाग येथील विभागप्रमुख/संचालक/शाखाप्रमुख यांनी आपल्या विभागात तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था यांनी आपल्यास्तरावर दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता पासून १ तास **'स्वच्छताही सेवा'** अंतर्गत श्रमदान कार्यक्रम आयोजित करुन सदर शासन पत्राचे अनुपालन करावे, ही विनंती.

**सोबत :- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मा.श्री.अ.म.बाविस्कर, उप सचिव यांचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ चे पत्र.**

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. एएन/ 3149 )
दिनांक : 30 SEP 2023 )

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व संचालक, प्रशाला
३. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग
४. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
५. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था

सदर पत्रातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१

---

क्रमांक: L.671359/HTED-24011(11)/27/2023-MHT-(UE-3)  दिनांक: २८ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.कुलगुरू,
सर्व अकृषि विद्यापीठे.

विषय : 'स्वच्छताही सेवा' अंतर्गत कार्यक्रम आयोजित करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा.प्रधानमंत्री यांनी केलेल्या आवाहनानुसार दि.०१ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी १० वाजता पासून १ तास 'स्वच्छताही सेवा' अंतर्गत राज्यभरात स्वच्छतेसाठी श्रमदान कार्यक्रम आयोजित करण्याचे अभिप्रेत आहे.

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थीमार्फत स्वच्छता करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. तसेच, आपल्या संलग्नीत महाविद्यालयात सदर उपक्रमाचा व्यापक प्रचार-प्रसिद्धी करून सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे.

आपला,

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. प्रधान सचिव, नगरविकास विभाग
२. सह सचिव, मा. मुख्य सचिव यांचे कार्यालय
३. संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण, पुणे